# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** लातूर  **P.S.(ठाणे):** औसा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0138  **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**25/03/2023 04:43

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार  **Date From (दिनांक पासून):** 24/03/2023
**Time Period (कालावधी):** पहर 8  **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/03/2023
**Time From (वेळेपासून):** 22:02 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 22:02 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 25/03/2023  **Time (वेळ):** 04:29 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 009
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/03/2023 04:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 0.05 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** स्वतःचे कार्यालयात, पोलीस स्टेशन आ◌ैसा ,आ◌ैसा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): महमदखुर्शीद अफसर पटवारी

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1993

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | हाडको कलनी, लातूर,लातूर,औसा,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | हाडको कलनी, लातूर,लातूर,औसा,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9637777038

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जगन्नाथ लक्ष्मणराव भंडे | | | 1. दावणगाव ता उदगीर,उदगीर, औसा,लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2000रूपये दराच्या 14 भारतीय चलनी नोटा व 500 रूपये दराच्या 2 भारतीय चलनी नोटा | 15,000.00 |



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

15,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

दिनांक 25/03/2023
फिर्याद
मी महमदखुर्शीद अफसर पटवारी वय 30 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. हडको कॉलनी, लातूर ता. जि. लातूर मो.नं. 9637777038.
समक्ष फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन मी हडको कॉलनी, लातूर येथे राहणारा आहे. मी दिनांक 24/03/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर चे पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब यांना 16:30 वाजताचे दरम्यान फोनवर संपर्क करुन एका लोकसेवका विरुध्द लाच मागणीची माझी तक्रार असल्याचे सांगुन त्यांनी मला राजीव गांधी चौक, लातूर येथील विश्रामगृह येथे येण्यास सांगितल्याने मी दि.24/03/2023 रोजी मी सदर ठिकाणी आलो असता पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड हे त्यांचे खाजगी वाहनाने सदर ठिकाणी त्यांच्या सोबत असलेल्या पंच व सापळा पथकातील कर्मचा-यासह हजर होवुन त्यांनी मला सापळा पथकातील सदस्य व पंचाची ओळख करून देवुन त्यांचे समक्ष माझे नांव गांव विचारले असता मी त्यांना माझे नांव वरीलप्रमाणे सांगुन पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड यांचे समक्ष माझी सविस्तर लेखी तक्रार दिली, ती खालील प्रमाणे.
"मी हडको कॉलनी, लातूर येथील राहणारा असून माझे कुटूंबासह सदर ठिकाणी राहतो. माझे सन 2020 मध्ये रिजवाना रसूल षेख रा. तुंगी ता. औसा जि. लातूर हिचे सोबत लग्न झाले होते. आमच्यात कौटुंबिक वाद झाल्याने माझी पत्नी रिजवाना हिने माझे विरुध्द पोलीस स्टेषन औसा येथे माझे विरुध्द तक्रार दिल्याने दि.15/03/2023 रोजी पोलीस स्टेषन औसा येथे गुरनं. 129/2023 कलम 498(अ),504,506,34 भादवि अन्वये गुन्हा दाखल केला असून त्या अनुशंगाने बीट जमादार भंडे साहेब यांनी मला पोलीस स्टेषन औसा येथे बोलावून माझे विरुध्द दाखल झालेल्या गुन्हयात अटक न करता नोटीस देवून सोडण्याच्या कामात मदत करण्यासाठी व तपासात माझे बाजूने मदत करणे करिता मला 30,000/- हजार रुपये लाचेची मागणी करीत आहेत. तरी संबंधीत कामाच्या अनुशंगाने बीट जमादार भंडे यांनी केलेली लाचेची मागणीप्रमाणे लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसुन मी त्यांना कुठलीही थकबाकी देणे नाही. मी आज रोजी पुन्हा बीट जमादार भंडे यांची भेट घेवुन संबंधीत कामासंदर्भाने चर्चा करुन माझे विरुध्द दाखल झालेल्या गुन्हयात अटक न करता नोटीस देवून सोडण्याच्या कामात मदत करण्यासाठी व तपासात माझे बाजूने मदत करण्यासाठी मी बोलणार असुन पुन्हा त्यांनी स्वतः अगर इतरामार्फत लाचेची मागणी केल्यास संबंधीतांवर लाचेची कार्यवाही करण्यात यावी. तसेच माझेषी त्यांचा कुठल्याही प्रकारचा आर्थीक तथा देवाण घेवाणीचा व्यवहार झालेला नाही, बाकी नाही.'' अषा आषयाची लेखी तक्रार दिली. मी दिलेली तक्रारीवर पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड व पंचानी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष-या केल्या आहेत.
पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने मी बीट जमादार भंडे यांनी मला माझ्या वर नमुद केलेल्या कामासाठी लाचेची मागणी केली आहे अगर कसे? यांची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन, ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सिलबंद पाकीटातील नविन कोरे मेमरीकार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाहीबाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या. आम्ही सर्व सापळा पथकासह खाजगी वाहनाने निघून औसा येथील पोलीस स्टेषन बाजूला असलेल्या किल्ला परिसरात वाहने आडबाजूस लावून थांबलो.
पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड साहेब यांनी पोकॉ/1400 कच्छवे यांचे मार्फतीने 18:41 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळयात आडकावुन मी व पंच क्रमांक 1 पटणे असे बाजूला असलेल्या औसा पोलीस स्टेषन येथे जावून खाकी युनिफॉर्म घातलेला काळ्या रंगाचा ईसम हा बीट जमादार भंडे असल्याचे



Scanned with CamScanner

पंचास ईशा-याने सांगुन त्यांची पोलीस स्टेषन औसा येथे पंचासमक्ष भेट घेतली असता त्यांनी माझ्◌ो वरील नमुद कामाच्या अनुशंगाने पंचासमक्ष समोरासमोर चर्चा केली असता, मी त्यांना कब होती जमानत अपनी..? असे म्हणालो असता त्यावर बीट जमादार भंडे म्हणाले की, साहब को बात करेंगे पहले .. तुम बातीच नही कर रहे .. हम क्या बात करे...? त्यावर मी म्हणालो तुम बात कर रहे नही .. उत्ता बात करे बाद, कैसा बात करे...! त्यावर बीट जमादार भंडे म्हणाले की, कुछ तो करके जानेका ... वो क्या उत्ता बोले पहाड बोले तो क्या पहाडीच करते क्या ? करना पडता है ना कुच्छ न कुच्छ.. अषी कामाची चर्चा करीत असताना त्यावर बीट जमादार म्हणाले हम लाख बोलेंगे तुम देते क्या ? त्यावर मी म्हणालो नही ना.. त्यावर बीट जमादार म्हणाले हम तुम्हारे हिसाब से बोलो.. नही होता उत्ता ... आधा निम्मा करदिया चले जाने का... अषी चर्चा करत म्हणाले की..दस पंधरा...? त्यावर मी म्हणालो कित्ता ? त्यावर बीट जमादार भंडे म्हणाले दस पंधरा... असे म्हणाले असतात्यावर मी म्हणालो पंधरा हजार.. त्यावर भंडे म्हणाले की हं.. असे म्हणून लाचेची स्पश्टपणे मागणी केली व पुढे मी म्हणालो बहोत होगये जी.. त्यानंतर बीट जमादार भंडे यांनी एवढे रहाचे... तीसचे पंधरा ? आधी मधी जावून येवू द्या.. पिंगर तर घ्यायला माणसं तर पाठविते इकडं... मी होत्याय तडजोड तु उगं... ती नाटकं करु नको असे म्हणून तडजोड करुन लाचेची रक्कम घे◌ून येण्यास सांगितली. मी त्यांना थोडया वेळात नमाज झाल्यावर पैसे घेवून येतो म्हणुन मी व पंच क्रमांक 1 पटणे असे किल्ला परिसरात थांबविण्यात आलेल्या सापळा पथकाच्या वाहनाजवळ 18◌:54 परत आलो. असता माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर कच्छवे यांच्याकडे दिले असता ते त्यांनी बंद केले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 पटणे यांना लाचेची मागणीच्या अनुशंगाने माझ्यात व बीट जमादार भंडे यांच्यात काय बोलने झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 पटणे यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वांनी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कच्छवे◌े यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व बीट जमादार भंडे यांच्यात झालेले संभाशण ऐकुन ते पंच क्रमांक 1 पटणे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे असल्याचे खात्री करुन बीट जमादार भंडे यांनी माझ्या वर नमुद कामासाठी माझ्याकडे 30,000/-रुपये लाचेची स्वतः मागणी करुन तडजोडी अंती आधा निम्मा म्हणत 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितल्याने त्यांचे विरुध्द लाचेची सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड यांनी मला बीट जमादार भंडे यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणे बाबत कळविले असता मी माझेकडील 2000/-रुपये दराच्या 07 चलनी नोटा व 500 रुपये दराच्या 02 भारतीय चलनी नोटा असे एकुण 15,000/-रुपये समक्ष हजर केले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड यांनी मला व पंचाना अ◌ॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोना 1253 गिरी यांनी अ◌ॅन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या षर्टच्या छातीवरील डाव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड यांना मिस कॉल करण्याचा बाबतचा सुनियोजीत ईशारा म्हणुन सांगण्यात आला. पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या.

सदर ठिकाणावरुन वाहनाने निघुन पोलीस स्टेषनच्या समोरील मोकळ्या जागेमध्ये जवळ येवून वाहन सर्वांचे नजरेआड लावून आडबाजुस आल्यानंतर पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड यांच्या सुचनेनुसार पोलीस कर्मचारी कच्छवे यांनी व्हाईस रेकॉर्डर 19◌:30 वा. चालु करुन माझ्या गळ्यात आडकावुन दिले त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 पटणे असे निघुन पोलीस स्टेषन औसा येथे बीट जमादार भंडे य◌ांनी बोलावल्या प्रमाणे तिथे जावुन बीट जमादार भंडे यांची भेट घेतली असता त्यांनी अंगातील खाकी युनिफॉर्म बदलून निळ्या रंगाची जीन्स आणि षर्ट घालून घातलेले दिसले तेव्हा त्यांचेकडे माझ्या कामाबाबत चर्चा करुन माझे विरुध्द दाखल गुन्हयात नोटीसची प्रक्रिया पूर्ण करुन बीट जमादार मला म्हणाले तजवीज..? त्यावर मी म्हणालो केली ना.. त्यावर बीट जमादार भंडे म्हणाले द्या ना.. असे म्हणाले असता मी माझे षर्टच्या छातीवरील डाव्या बाजुच्या खिषातील अ◌ॅन्थ्रासीन पावडरयुक्त 15,000 /-रुपये (ज्यात 2000/-रुपये दराच्या 07 चलनी नोटा व 500 रुपये दराच्या 02 भारतीय चलनी नोटा) लाचेची रक्कम लोकसेवक बीट जमादार भंडे यांचे पुढे धरली असता त्य◌ांनी त्यांचे डाव्या हाताने सदरची अ◌ॅन्थ्रासीन पावडरयुक्त 15,000/-रुपये ( ज्यात 2000/-रुपये दराच्या 07 चलनी नोटा व 500 रुपये दराच्या 02 भारतीय चलनी नोटा) लाचेची रक्कम स्वीकारुन त्यांच्या अंगातील निळसर रंगाच्या पॅन्टच्या डाव्या बाजूच्या पाठीमागील खिषामध्ये ठेवली. त्यावर बीट जमादार म्हणाले करुन टाकू काय ते... इथच ठेवणार हाय सोबत घेवून जाणार नाय इथच ठेवणार हाय.. किती हायत ? त्यावर मी म्हणालो पंधरा.. असे म्हणत मी लागलीच पोलीस स्टेषन औसा येथील त्य◌ांचे कार्यालयातून उठत बाहेर येवून पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड यांना मिसकॉल देवून नियोजीत लाचस्विकृतीचा इषारा केला. पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड व पंच क्रमांक 2 सोनटक्के व सापळा



Scanned with CamScanner

पथकातील सदस्य सदर ठिकाणी आले. माझेकडील व्हाईस रेकॉर्ड पोलीस कर्मचारी कच्छवे यांचेकडे दिले ते त्यांनी घेवुन बंद केले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड यांनी पंच क्रमांक 1 पटणे यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 पटणे यांनी समोर निळसर रंगाची जिन्स घातलेल्या ईसमाकडे हात करुन हे बीट जमादार भंडे असुन त्यांनी मागणी केलेली 15,000/-रुपये लाचेची रक्कम ही त्यांच्या समोर घेवून लोकसेवक भंडे यांनी त्यांच्या अंगातील निळसर रंगाच्या पॅन्टच्या पाठीमागील डाव्या बाजूच्या खिशामध्ये ठेवली आहे. मी वर सांगीतलेल्या हकीकती प्रमाणे मिळती जुळती हकीकत पंच क्रमांक 1 पटणे यांनी सांगीतली त्यावेळी पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड यांनी त्यांचेकडील ओळखपत्र बीट जमादार भंडे यांना दाखवून त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव जगन्नाथ लक्ष्मणराव भंडे वय 43 वर्षे, पद पोलीस हवालदार, ब.नं. 622, वर्ग 3, नेमणुक पोलीस स्टेषन औसा ता. औसा जि. लातूर रा. दावणगाव ता. उदगीर जि. लातूर ह.मु. गिरवलकर नगर, लातूर असे असल्याचे सांगितले. पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड यांनी पंच क्रमांक 2 सोनटक्के यांचे हस्ते बीट जमादार भंडे यांच्या जवळील अंगातील निळसर रंगाच्या पॅन्टच्या डाव्या बाजूच्या पाठीमागील खिषामध्ये ठेवलेली लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 पटणे यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन व नंबरषी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निर्दषनास आले. त्यानंतर तेथील आवष्यक ती सापळा कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पोलीस उपअधीक्षक पंडीत रेजितवाड यांनी पुढील कार्यवाही करणे करिता बीट जमादार भंडे यांना सोबत घेवून घटनास्थळावरुन रवाना होवून लाप्रवि कार्यालय लातूर येथे येवून पुढील कार्यवाही पुर्ण केली.
तरी यातील लोकसेवक जगन्नाथ लक्ष्मणराव भंडे वय 43 वर्षे, पद पोलीस हवालदार, ब.नं.622, वर्ग 3, नेमणुक पोलीस स्टेषन औसा ता. औसा जि. लातूर रा. दावणगाव ता. उदगीर जि. लातूर ह.मु. गिरवलकर नगर, लातूर यांनी माझे विरुध्द पोस्टे औसा येथे दाखल झालेल्या गुन्हयात अटक न करता नोटीस देवून सोडण्याच्या कामात मदत करण्यासाठी व तपासात माझे बाजूने मदत करणे करिता पंचासमक्ष माझ्याकडे 30,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 15,000/- रुपये लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगून ती दि.24/03/2023 रोजी पोलीस स्टेषन औसा येथील स्वतःचे कार्यालयात लाचेची रक्कम 22:02 वा. चे सुमारास पंचासमक्ष स्वतः स्विकारली आहे. म्हणुन माझी आरोपी विरुध्द कायदेषिर तक्रार आहे.
मी वर नमुदप्रमाणे सांगितलेली तक्रार ही पोना गिरी यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन त्यांची प्रींट काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली. ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

shankar umakant patwari(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(पुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.ठा.अंमलदार
पो.स्टे.औसा

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** shankar umakant pa
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

R
25-03-2023
स्टे डा नं. 09
वेळ 0429
अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला
असून गु र नं 138/2023
क 7. भ्र प्र का 1988 अन्वये
सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उप
अधिक्षक रेणीतवाड हे करित
आहेत

पो.ठा.अंमलदार
पो.स्टे.औसा